MHKO050030972021

**नियमित दिवाणी दावा क्र.२०७/२०२१ मधील**
**निशाणी क्र.२८ खालील आदेश**
**चांदू ओमाना कांबळे विरुध्द पांडुरंग ओमाना कांबळे**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१,५,६,७,व ८ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ७ नियम ११ बी प्रमाणे दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांच्या अर्जाप्रमाणे यातील प्रतिवादी क्र.१,५,६,७,व ८ या प्रतिवादींनी सदरचा अर्ज दाखल केला असून असे कथन केले आहे की, प्रस्तूतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द वाटप, तुटक कब्जा व कायम मनाईसाठी दाखल केला असून सदर दाव्याचे कामी यातील वादी यांनी दावा अर्जी कलम १अ या शेतजमिनी नमूद करुन त्यामधील वडिलार्जित घर मिळकती हा दावा वाटपाचा विषय नमूद केला आहे व फक्त शेतजमिनीच्या आकारावर दाव्याची कोर्ट फी आकारणी केली आहे ती अत्यंत चुकीची व बेकायदेशीर आहे. वादीचे म्हणणेप्रमाणे कलम १अ मधील शेतजमिनी व त्यामधील वडिलार्जित घर मिळकती अशी दावा मिळकत आहे. त्याप्रमाणे वादींनी कलम १ मधील दावा मिळकतीचे वडिलार्जित घर मिळकतीचे असेसमेंटचे उतारे हजर करुन त्यावर योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प लावणे कायदयाने आवश्यक आहे. सबब वादींनी मे.कोर्टाची दिशाभूल करुन अत्यंत अपूरा कोर्ट फी स्टॅम्प लावून व घर मिळकतीचे असेसमेंट उतारे दाखल न करता सदरचा वाटपाचा दावा दाखल केला असल्यामूळे सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा. तसेच दावा मिळकती १अ मधील वडिलार्जित् घर मिळकतींचे असेसमेंटचे उतारे या दावेसोबत जोडून त्या घर मिळकतींच्या किंमतीवर कायदयातील तरतुदींनूसार सदर घराच्या असेसमेंट उता-यावरील असलेल्या घराच्या किंमती एकत्र करुन त्यापैकी वादीच्या हिश्शेच्या रक्कमेवर महाराष्ट्र कोर्ट फी ॲक्ट प्रमाणे कोर्ट फी लावणे कायदयाने अनिवार्य होते व आहे. सबब वादी यांनी फक्त शेतमिळकतीवरच कोर्ट फी स्टॅम्प लावला असून त्यातील वडिलार्जित घर मिळकतीवरील असेसमेंटचे उतारे हजर करुन त्यांचे योग्य त्या

मुल्यांकनाप्रमाणे कोर्ट फी स्टॅम्प लावून सदरच्या वाटपाचा दावा मे.कोर्टात दखल करणे आवश्यक आहे. वादीने तसे न केल्यास सदरचा दावा फी अपूरी असल्यामूळे चालणेस पात्र नाही, अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर वादी यांनी म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानूसार सदरचा दावा वाटणी होवून मिळणेसाठी दाखल असून दावा अर्जी कलम १अ च्या मिळकती शेत जमिनी आहेत. सदर शेत जमिनीमध्ये जुनी शेत घरे आहेत. ती जीर्ण, वापरात नाहीत. सदर शेत घरे शेत जमिनीत आहेत. घरे गावठाणात नाहीत. त्यामूळे त्यांचा असेसमेंट उतारा घेणेचा प्रश्न येत नाही. प्रतिवादींचा अर्ज निरर्थक असा आहे. सदर प्रतिवादींनी सदर कामातील निशाणी ५ चौकशी टाळणेसाठी चुकीच्या अर्जाची रचना केली आहे. सदर वादीनी दावा अर्जी कलम १अ शेत जमिनीच्या आकारावर योग्य कोर्ट फी स्टॅम्प दिला आहे. त्यामूळे सदरचा अर्ज नामंजूर व्हावा. वादाकरीता प्रतिवादीचे म्हणणेप्रमाणे कोर्ट फी स्टॅम्प देणे भाग झालेस वादी देणेस तयार आहेत.

४. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा दावा हा वाटणी होवून स्वतंत्र व तूटक कब्जा होवून मिळणेसाठी व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. सदर अर्जातील कथनाप्रमाणे दावा मिळकतीत १अ मधील घर मिळकतीचे असेसमेंट उता-याप्रमाणे व नियमाप्रमाणे वादीने महाराष्ट्र कोर्ट फीस ॲक्टप्रमाणे कोर्ट फीस भरलेली नाही. घर मिळकतीचे मूल्यांकान लपवून ठेवून त्यावर कोर्ट फीस लावलेली आहे. प्रतिवादी यांच्या सदर म्हणण्या पृष्ठयर्थ प्रतिवादी यांनी मिळकत नं.४३१ श्री.ओमान्ना विठ्ठल कांबळे यांच्या मिळकतीचे दूय्यम निबंधकसो हातकणंगले यांच्या कडील मूल्यांकन दाखला अभिलेखावर दाखल केला आहे. सदर बाजारमूल्य तक्त्याप्रमाणे कोर्ट स्टॅम्प फीस नियमाप्रमाणे अधिक भरावी लागते असे प्रतिवादी यांचे कथन आहे. सदर दाव्यात अदयाप पूरावा होणे बाकी आहे. तसेच सदर दाव्यात योग्य ती कोर्ट स्टॅम्प फीस भरली नसल्यास सदरचा दावा हा प्राथमिक स्टेजवर असल्याने कोर्ट स्टॅम्प फीस च्या मुद्दयावर योग्य ती नियमानूसार कोर्ट स्टॅम्प फीस भरण्यास वादी यांना संधी देणे न्यायोचित होईल. त्यामूळे सदर

अर्जाचा विचार करुन सदरचा दावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता तसेच नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन तसेच अर्जातील नमूद कारणे विचारात घेवून दोन्ही पक्षांना संधी देणे न्यायोचित ठरेल. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे-

**आदेश**

१. सदरचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. दाव्यात नियमाप्रमाणे कोर्ट स्टॅम्प फीस संबंधित सहाय्यक अधिक्षक यांनी तपासणी करुन व नियमाप्रमाणे कोर्ट स्टॅम्प फीस कमी दिली असल्यास त्याप्रमाणे वादी यांनी नियमाप्रमाणे कोर्ट स्टॅम्प फीस भरुन पूर्तता सदरील आदेशापासून एक महिन्याच्या आत करावी.

sd/-

**ठिकाण - इचलकरंजी**
**दिनांक - १७/०१/२०२४**

**(एम.एम.चौधरी )**
**४ थे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,**
**इचलकरंजी.**